# कोरोना महामारीमुळे भारतीय औद्योगिक क्षेत्रातील रोजगारावर झालेला परिणाम: एक भौगोलिक अभ्यास

**समाधान उत्तम दाभाडे**
संशोधक विद्यार्थी

**गोषवारा**

कोरोनाच्या महामारीमुळे झालेले आर्थिक नुकसान वेगाने भरून निघण्याची अपेक्षा ठेवता येण्यासारखी परिस्थिती नाही. त्यासाठी वाट पाहावी लागण, अपरिहार्य आहे. कोविड-१९ अर्थात कोरोना विषाणूच्या प्रसाराचा भारतासह संपूर्ण जगातील प्रत्येक घटकावर अत्यंत खोलवर परिणाम झालेला आहे. आज प्रत्येक क्षेत्र कोविड-19 महामारीच्या विळख्यात पडलेले आहे. त्यामध्ये औद्योगिक क्षेत्र, शेती क्षेत्र, वाहतूक क्षेत्र, सेवा क्षेत्र, करमणूक क्षेत्र इ. क्षेत्रावर फार मोठ्या प्रमाणावर कोविड-19 महामारीचा परिणाम झालेला आहे. यामुळे या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांवार याचा फार मोठया प्रमाणावर परिणाम झालेला आहे. लोकांना आपले कामाचे ठिकाण सोडून परत आपल्या गावी जावे लागले. प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये कोरोना महामारीमुळे भारतीय औद्योगिक क्षेत्रावर झालेला परिणाम हा विषय घेऊन संशोधकाने या संशोधन पेपरद्वारे भारतामधील सद्यस्थिती दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**बीजसंज्ञा :** कोविड-19, जागतिक स्थिती, उद्योग क्षेत्र, उद्योगक्षेत्रातील रोजगारावर झालेला परिणाम.

## प्रस्तावना

कोरोना व्हायरस हा विषाणूंचा एक गट आहे. या व्हायरसमुळे सस्तन प्राण्यांना आणि पक्ष्यांना विविध रोग होतात. यांत गायींना व डुकरांना होणाऱ्या अतिसाराचा आणि कोंबड्यांना होणाऱ्या श्वसन रोगाचा समावेश आहे. या विषाणूचा प्रसार मानवांमध्ये श्वसन संसर्गाने होतो. कोरोना व्हायरसचा प्रतिबंध करणारी लस किंवा रोग झाल्यास घ्यायची टिव्हायरल औषधे अजूनतरी (२०२० साल) उपलब्ध नाहीत. कोरोनाव्हायरस प्रथम १९६० च्या दशकात सापडले. सर्वात आधी सापडलेल्यांमध्ये कोंबड्यांमध्ये एक संसर्गजन्य ब्रॉन्कायटीस विषाणू आणि सामान्य सर्दी असलेल्या दोन रुग्णांमध्ये (नंतर ह्यूमन कोरोनाव्हायरस २२ E ई आणि ह्यूमन कोरोनाव्हायरस ओसी असे नाव देण्यात आले) होते. २००३ मध्ये सार्स-सीओव्ही, एचसीओव्ही एनएल २००४ मध्ये एचकेयू १, २०१९ मध्ये मेर्स-सीओव्ही आणि २०१९ मध्ये एसएआरएस-कोव्ही -२ (पूर्वी 2019-एनसीओव्ही म्हणून ओळखले जाणारे) या कुटुंबातील अन्य सदस्यांची ओळख पटली आहे. यामध्ये गंभीर श्वसनमार्गाचे संक्रमण होते. कोरोना व्हायरस कणांचा व्यास सुमारे १२०एनएम (NM-Manometer) आहे. विद्युतपरमाणु सूक्ष्म आलेखमधील विषाणूचा लिफाफा विद्युतपरमाणु दाट कवच असलेली एक वेगळी जोडी म्हणून दिसून येते.

## कोविड-१९ काय आहे?

कोविड-१९हा२०१९ मध्ये सापडलेल्या कोरोना विषाणूमुळे होणारा आजार आहे. तो सार्स -कोवि-२(Severe Acute Respiratory Syndrome Coronavirus 2) नावाच्या कोरोना व्हायरसमुळे होतो.

सामान्यत या रोगाची लक्षणे फ्लू सदृश आढळतात. हा अत्यंत संक्रमक रोग आहे.

**जागतिक स्थिती:**

सर्वप्रथम चीनच्या वुहान प्रांतात, मोठ्या प्रमाणात नोंदविलेला कोविड -१९, जगभरात वेगाने पसरला आहे. १५ मे २०२० पर्यंत जगात ४३,४७,९३५ लोकांना याची लागण झाली होती २,९७,२४१ लोकांचा मृत्यू झालेला होता. भारतात ८५,९४० लोकांना लागण झाली होती आणी २७५२ लोकांचे मृत्यू १६ मे २०२० पर्यंत नोंदिले गेले होते.[8] महाराष्ट्रात २९,१०० लोकांना लागण झाली होती १,०६८ लोकांचा मृत्यू झाला होता.[4] मुंबई महानगर पालीकेच्या क्षेत्रात १६,७३८ लोकांना लागण झाली होती ६२१ लोकांचा मृत्यू झाला होता १४ मे २०२० पर्यंत आकडा नोंदिला गेला होता.

**कोविड-19 आणि उद्योग क्षेत्र :**

आजच्या मोठ्या संकटामुळे अनेक क्षेत्र प्रभावित झालेले आहेत. ही यादी खूप मोठी आहे. त्यात तयार माल आणि उपकरणांच्या किंवा वाहनांच्या सुट्या भागांची निर्मिती करणाऱ्या उद्योगांचा समावेश आहे. एका विकेंद्रीकृत उत्पादन प्रक्रियेबरोबरच, जिथे अनेक बाबतीत उपकरणांच्या सुट्या भागांचे उत्पादन मूळ प्रकल्पांमध्ये घेता येत नाही, तसंच सुट्या भागांचा पुरवठा ठप्प होणे या बाबी संपूर्ण साखळी मोडून टाकू शकतात. अशा प्रकारच्या अडथळ्यामुळे आंतरराष्ट्रीय कराराचा भंग होऊ शकतो. त्यात आंतरराष्ट्रीय बाजारात कंपन्या काळ्या यादीत टाकण्याच्या जोखमीचाही समावेश आहे. कोरोनाच्या या संकटामुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या जात आहेत. सुरुवातीच्या टप्प्यातच वास्तविक आणि संभाव्य नोकऱ्या गमावण्याची आकडेवारी भीतीदायक आहे. विशेषतः त्याचा तात्काळ परिणाम उत्पादन निर्मिती क्षेत्रावर नव्हे, तर हॉटेल उद्योगासह वाहतूक, पर्यटन उद्योगावर झाला आहे. प्रदीर्घ कालावधीतील लॉकडाऊन हे अर्थव्यवस्था आपल्या अनुषांगिक परिणामांसह कमतरतांचे कारण ठरू शकते. आर्थिक घडामोडींनी गाठलेला खालचा स्तर आणि लॉकडाऊनमुळे आर्थिक व्यवस्थाच ठप्प होऊ शकते. विशेषतः छोटे उद्योग आणि कमकुवत उद्योग. हे बँकांच्या भविष्यातील संपत्तीच्या गुणवत्तेबद्दलचा अंदाज कमकुवत असल्याचे दर्शवते. कदाचित 'एनपीए' (अनुत्पादक कर्ज) आकडेवारीत पुन्हा वाढ होत असल्याचे दिसत असले तरी, ती यावेळी आधीच्या तुलनेत अधिक आहे. यामुळे बँकिंग क्षेत्रातील तरलता आणि पतपुरवठ्यावर विपरित परिणाम होईल.

**कोरोना महामारीमुळे भारतीय औद्योगिक क्षेत्रातील रोजगारावर झालेला परिणाम:**

कोविड-१९ चा परिणाम झाला नाही असे उद्योग जगतातले कोणतेही क्षेत्र राहिले नाही. हे खालील प्रमाणे पाहू : भारतीय अर्थव्यवस्थेत उत्पादन क्षेत्रात मोठे योगदान देतात त्यांच्यासाठी एमएसएमई अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राच्या अनेक उपविभागांकडूनही योगदान असते. अशा प्रकारे मोठ्या उद्योगावर परिणाम झाला तर त्याचा इतरांवर अनेक पटींनी आणि मोठा परिणाम होतो.

**वाहन उद्योग :** वाहन उद्योगासमोर विक्री घटल्याचे आव्हान उभे ठाकले आहे. त्याचा परिणाम संबंधित उद्योगांवरही - उदाहरणार्थ, वाहनांचे सुटे भाग निर्माण करणारे क्षेत्र जे प्रामुख्याने एमएसएमईमध्ये आहे, त्यावरही होत आहे. कच्च्या मालाची खरेदी, रोजगार, त्यातून मिळणारे उत्पन्न आणि मागणी या सर्वांवरच मोठा परिणाम होत आहे. मर्यादित वित्तीय क्षमता, मर्यादित व्यवस्थापकीय कुशाग्रता असलेल्या एमएसएमई क्षेत्राच्या संकटात यामुळे वाढ होत आहे. त्याचा उलट चक्राकार परिणाम जाणवतो. टायर आणि ट्यूब, आंतर सजावटीसाठीचे साहित्यनिर्माते तसेच सेकंड

हॅण्ड वाणिज्यिक वाहनासाठीची मागणी आणि इतर अनेक संबंधित उद्योगावर त्याचा विपरीत परिणाम होतो.

**रिअल इस्टेट क्षेत्र :**

चिंता करण्यासारखे आणखी क्षेत्र आहे ते म्हणजे रिअल ईस्टेट अर्थात स्थावर मालमत्ता क्षेत्र. निवासी आणि वाणिज्यिक अशा दोन्ही विभागांत या क्षेत्राच्या मागणीत उदासीनता आली आहे. मजुरांना मोठ्या प्रमाणात रोजगार पुरवण्यात कृषी क्षेत्रानंतर दुसरा क्रमांक या बांधकाम क्षेत्राचा आहे. याचाच अर्थ या क्षेत्रातील मंदी ही बेरोजगारीकडे नेणारी ठरते. सिमेंटवर २८ टक्के जीएसटी आहे. त्याचा परिणाम पायाभूत सुविधांसाठीच्या सिमेंट कॉन्क्रीटच्या रस्ते बांधकामावर झाला. निवारा ही सर्वांसाठी प्राथमिक गरज असून पंतप्रधानांनी २०२४ पर्यंत सर्वांसाठी घर पुरवण्याचा संकल्प केला आहे. या क्षेत्रात आलेल्या मंदीचा, सिमेंट, पोलाद, विटा, टाईल्स, ग्रॅनाईट, इलेक्ट्रिक वायर्स आणि सुशोभीकरणासारख्या संबंधित इनपुट उद्योगावरही परिणाम जाणवतो.

**विमान वाहतूक क्षेत्र :**

नागरी विमान वाहतूक ठप्प झाल्याने, आधीच वित्तीय तणावाखाली असलेले हे क्षेत्र अधिकच आर्थिक खोलात जाऊ लागले आहे. उत्पन्नाचा ओघ सुरू नसला तरी हवाई क्षेत्रातील विमानतळ किंवा विमानासाठीचे दीर्घ मुदतीवरच्या करारानुसार द्यावे लागणारे भाडे यासारखा खर्च मात्र सुरूच आहे. या कंपन्यांत नियुक्त तांत्रिक, कुशल आणि अकुशल कर्मचारी, वैमानिक, सहकर्मचारी आणि इतर कर्मचारी यांचा ताफा सांभाळत हवाई वाहतूक कंपनी आर्थिक दृष्ट्या तग धरून ठेवणे हे अतिशय कठीण काम आहे. सुरक्षित वावराचे पालन करताना प्रती प्रवासी भाडेखर्चात वाढ होण्याची शक्यता असून यामुळे प्रवासी रेल्वे किंवा रस्ते यासारख्या इतर पर्यायांकडे वळण्याची शक्यता आहे. प्रादेशिक कनेक्टीविटीसाठी उडान सारख्या संकल्पनेवर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. या क्षेत्राला म्हणूनच बेलआउटची आवश्यकता आहे.

**पर्यटन व आतिथ्य उद्योग :**

पर्यटन आणि आतिथ्य उद्योगही प्रवासी बुकिंग नाही, कामासाठी किंवा इतर पर्यटन नाही, हॉटेलमधे आणि रेस्तराँमध्ये अतिथी नाहीत, परिषदा भरवल्या जात नाहीत यामुळे अतिशय तणावात आहे. रोजगार पुरवणारे हे क्षेत्र, त्याचे मुख्य कौशल्य फक्त आतिथ्य पुरतेच मर्यादित असल्याने करोना संकटात आर्थिकदृष्ट्या हे क्षेत्र सांभाळणे कठीण होणार आहे. याचा प्रशिक्षण आणि कौशल्य विकासावर परिणाम होणार आहे. इथे कुशल कामगारांना मागणी असते, त्यांना त्यांचे कौशल्य अद्ययावत करण्याची संधी असते. मात्र त्यांना त्यांचे कौशल्य दाखवण्यासाठी मार्ग मिळणार नाही, असे चित्र आहे.

**तांत्रिक कौशल्य विकास क्षेत्र :** अतिशय समर्थपणे सुरु झालेले आणि एनएसडीसीद्वारा सुरू असलेले तांत्रिक कौशल्यविकास क्षेत्र निष्क्रिय राहण्याची शक्यता आहे. माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठीही हा काळ कठीणच आहे. कोणतीही नवी मालिका किंवा चित्रपट प्रदर्शित होत नसून आपण मागच्या भागांचे पुनर्प्रक्षेपण पाहत आहोत. हे संपूर्ण क्षेत्रच, विशेषतः चित्रपटनिर्मितीच्या रोजच्या वेळापत्रकावर अवलंबून असणारे रोजंदारीवरचे मजूर मोठ्या आर्थिक संकटात आहेत.

**वित्तीय क्षेत्र :**

वित्तीय क्षेत्रात, कर्ज थकबाकीदार वाढल्याने आणि हप्ते भरण्यासाठी वेळेची सवलत दिल्याने बँकांच्या वित्तीय कामगिरीवर परिणाम होऊन संघटित वित्तपुरवठ्यावर त्याचा ताण येणार आहे.

दर्जेदार वित्तपुरवठा आणि आवश्यक क्षेत्राला वेळेवर दिलासा यांच्या अभावामुळे हे क्षेत्र आधीच ताणाखाली होते. अनुत्पादित मत्तेतील वाढीचा संबंध करोनाशी जोडता येईल. उत्पादनाला आकार देण्यासाठी वित्तपुरवठ्याची एकीकडे आवश्यकता आहे, तर दुसरीकडे कर्ज बुडीत जाण्याची भीती बँकांना वाटत असल्यामुळे त्यांनी कर्जपुरवठा मर्यादित ठेवला आहे. याबरोबरच नादारी आणि दिवाळखोरीत वाढ होण्याची शक्यता असल्याने आयबीसी प्रकरणात वाढ होण्याची शक्यता असून त्यातून आर्थिक ताण वाढणार आहे. एकीकडे उद्योगांना निधीची आवश्यकता आहे तर दुसरीकडे बँका त्यासाठी फारशा उत्सुक नाहीत. उद्योगांना चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात वित्तीय सहाय्य देणारी विविध पॅकेजेस जाहीर झाली असली तरी त्याची अंमलबजावणी बँकांमार्फत होणार असल्यामुळे याकडे पाहावे लागेल.

**कोरोनाचे संकट भारतावर आणि जगावर :**

केवळ भारतच नाही तर जगभरातले 190 हून अधिक देश कोरोनामुळे प्रभावित झाले आहेत. भारतात हजारो मजूर स्थलांतर करत आहेत, पण संपूर्ण जगात काय स्थिती आहे. संयुक्त राष्ट्रांशी संलग्न इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायजेशनने (ILO) म्हटलं आहे की कोरोना व्हायरसच्या साथीमुळे अंदाजे अडीच कोटी रोजगार जातील. अर्थात, ज्याप्रमाणे 2008-09 मध्ये मंदी आल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न करण्यात आले तसे झाले तर आपण या संकटातून बाहेर निघू, असं देखील ILOने म्हटलं आहे. कोरोना व्हायरसमुळे लॉकडाउन, कामाचे तास कमी होणं तसेच पगारकपात या गोष्टींमुळे बेरोजगारी वाढू शकते. याचा सर्वांत जास्त फटका विकसनशील देशांना बसेल, असं ILO सांगतं. 2020 मध्ये अडीच कोटी कामगारांचा अंदाजे 860 अब्ज डॉलर ते 3,400 अब्ज डॉलर इतका पगार निघाला असता. पण हे पैसे त्यांच्या खिशात जाणार नाहीत. त्यांच्यावर अवलंबून असलेला दुकानदार वर्गालाही याचं नुकसान सोसावं लागणार आहे. बरं ज्या कामगार वर्गातील ज्या लोकांजवळ काम किंवा रोजगार असेल त्यांची स्थिती खूप चांगली असणार आहे का? तर त्याचं उत्तर ILO ने दिलं आहे की 90 लाख ते साडे तीन कोटी इतके लोक हे वर्किंग पॉवर्टीमध्ये असतील. म्हणजेच या लोकांकडे काम असेल पण आपल्या गरजा भागवण्याइतकाही पगार त्यांना मिळणार नाही.

**कोविड-19 आणि कामगार :**

या संकटाने अर्थव्यवस्थेचे असलेले मूळच अस्ताव्यस्त करून टाकले आहे. म्हणून त्याची बांधणी किंवा पुनर्बांधणी करण्यासाठी अधिक कालावधी लागण्याची शक्यता आहे आणि केवळ ते दीर्घकालानंतरच शक्य आहे. हेच चित्र भारतात पाहायला मिळत आहे. येथे कामगारांची संख्या रोडावली आहे. हा आजार पुन्हा बळावू नये किंवा पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सर्वतोपरी खबरदारी घेतली जात आहे. परत येणाऱ्या कामगारांची कसून वैद्यकीय तपासणी केली जात आहे. ज्या प्रमाणे अमेरिकेत अर्थतज्ज्ञ किंवा गुंतवणुकदारांना अपेक्षित आहे, त्याप्रमाणे भारताकडून तेजीने नुकसान भरून निघण्याची अपेक्षा न ठेवता, हे नुकसान भरून निघण्यासाठी थोडी वाट पाहणे अपेक्षित आहे.

**सारांश :**

आज कोरोनामुळे प्रत्येक देश आणि संपूर्ण मानव जात भरडुन निघालेली आहे. मोठ्या प्रमाणावर जीवित हानी, वित्त हानी, बेकारी, व्यवसाय बंद यामुळे प्रत्येक जण आजच्या काळात त्रासून गेलेला आहे. लोक मोठ्या प्रमाणावर बेकरीचा सामना करीत आहे. आज प्रत्येक उद्योगधंदे बंद पडण्याच्या मार्गांवर आहेत. याचा सर्वात जास्त परिणाम रोजगारावर झालेला आपल्याला दिसतो. वरील

संशोधन पेपर मध्ये कोरोना महामारीमुळे भारतीय औद्योगिक क्षेत्रातील रोजगारावर झालेला परिणाम या विषयावरती माहिती देऊन यामध्ये मुद्यानुसार विश्लेषण केलेले आहे.

**संदर्भ :**


1. Perlman, Stanley (2015). "Coronaviruses: An Overview of Their Replication and Pathogenesis". Methods in molecular biology (Clifton, N.J.). **1282**: 1-23. doi:10.1007/978-1-4939-2438-7_1
2. https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019
3. MoHFW, GoI: https://www.mohfw.gov.in/# 3:
4. https://arogya.maharashtra.gov.in/1175/Novel--Corona-Virus
5. जागतिक आरोग्य संघटना. "Coronavirus disease 2019 (COVID-19) Situation Report - 53"(PDF). World Health Organization. १४ मार्च २०२० रोजी पाहिले.
6. BBC News 25 Feb 2029
7. अक्षोभ गिरीधरदास (2020): २०२० ठरलं कोरोनाचं वर्ष: ORF : 28 मार्च 2020.
8. वर्ल्ड डेस्क, अमर उजाला, बीजिंग Updated Wed, 06 May 2020 11:15 PM IST
9. अरविंद व्यं. गोखले (2020): चीन विरुद्ध अवघे जग महाराष्ट्र टाइम्स | Updated: 24 May 2020, 07:28:00 AM
10. जोनाथन मार्कस (2020): कोरोना व्हायरसची साथ आणि पडद्यामागून खेळलं जाणारं युद्ध : BBC News :bbc.com : 22 मार्च 2020.
11. कशिश पर्पियानी (2020): कोरोनासंकटाचे 'ट्रम्प' कारण : ORF : orfonline.org.:8 एप्रिल 2020.
12. तुषार कुलकर्णी (2020): कोरोना व्हायरस: कोव्हड-19 मुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतोय. : www.bbc.com